स्थायी समिती

दाखल विषय – दि. २८/७/२०२०

विषय क्रमांक :– ३३५ त्वर्य

Critical Patient Management System उपलब्ध करून घेणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ६७,(३)(क) नुसार खालील बाबीस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मा.तंत्र./१८५ दि.२३/७/२०२० चे पत्र.

1) Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांच्याकडून गंभीर कोरोना रूग्णांची सेवा आणि डिजीटल माहिती पुरविण्याचे 1 वर्षासाठी कामकाज करून घेणेस.

२) Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांना one time setup संगणक प्रणालीची रक्कम रू.10.00 लाख + Taxes देणेस

३) प्रती गंभीर रूग्ण र.रू.300/- + Taxes या प्रमाणे बिल अदा करणेस.

४) Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांच्याशी करारनामा करणेस.

५) Indohealth Software Solutions Pvt.Ltd यांना बिल अदा करणेस खालील बजेट हेडवर खर्च करणेस.
RE11N103
(सन 2020-2021) अर्थशिर्षकातून खर्च करणेस.
विशेष प्रकारची हिशोबी कामे संगणकमार्फत करून घेणे,
ERP अंमलबजावणी, Software Development,
GIS, Work Management System, Kiosk व तदनुषंगिक कामे करणे.

विषय क्रमांक :– ३३६ त्वर्य

पुणे महानगरपालिका झोन क्र.३ अंतर्गत सिंहगड रोड क्षेत्रीय कार्यालयाचे अंतर्गत पुणे म.न.पा.चे कै.मुरलीधर लायगुडे या हॉस्पीटल इमारत व नवले शाळा येथे पुणे मनपा तर्फे स्थापित केलेल्या आयसोलेशन/ क्वारंटाईन/ccc क्रेंद्रसाठी दररोज दाखल होणाऱ्या कोरोना बाधित नागरिकांना दैनंदिन सकाळी चहा , नाश्ता, दुपारचे जेवण,सायंकाळी चहा व बिस्किट,रात्रीचे जेवण, लहान मुलांसाठी दुध व बिस्कीटे, गरजेनुसार बिस्लेरी पाणी बॉटल व इतर आवश्यक बाबी तयार अन्न पुरविणे या कामाचे एजन्सी १) मे.मॉर्डन केटरर्स २) मे.श्रीमती देशमुख ३)मे.साईलिला कॅफे यांच माहे मे २०२० मधील दि.०१/०५/२०२० ते ३१/५/२०२० अखेरचे खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(३)(क) अन्वये करणेसाठी खालील बाबीस पश्चात मान्यता देण्यात येत असून मा.मुख्य सभेकडे अवलोकनार्थ सादर करण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/परि क्र.३/१८७ दि.२४/७/२०२० चे पत्र.

१) श्रीमती निर्मला देशमुख यांनी कै.लायगुडे हॉस्पीटल येथे दि.१/५/२०२० ते दि.३१/५/२०२० अखेर पुरविलेल्या मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ठ (अ.१) प्रमाणे सकाळचा चहा व नाष्टा, मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ठ (अ–२) प्रमाणे दुपारचा चहा व परिशिष्ठ (अ–३) प्रमाणे लहान मुलांसाठीचे दुध यांचा एकूण खर्च र.रू.६३,७१५/–, १०% जी.एस.टी सह र.रू.७०,०८६.५० यांना आदा करणेस.

२) मे.मॉर्डन केटरर्स (श्री.राम यत्नाळकर ) यांनी मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील परिशिष्ट (क) प्रमाणे उपरोक्त हॉस्पीटल मध्ये दाखल पेशंटला सकाळ व संध्याकाळचे जेवण र.रू.७५/– प्लेट प्रमाणे पुरविले असून दि.१/५/२०२० ते दि.३१/५/२०२० पर्यंत त्यांचा खर्च र.रू.२,४१,२७५/– एवढा खर्च होत असून १०% जी.एस.टीसह एकूण खर्च २,६५,४०२/– यांना आदा करणेस.

३) वरील १ व २ प्रमाणे खर्च खालील अर्थशिर्षकावर करणेस.
अर्थशिर्षक – सन २०२०–२१ चे अंदाजपत्रक
Covid-19 अंतर्गत अत्यावश्यक भांडवली महसूल कामासाठी (खर्च)
**RE17F257**

४) वरील अ.क्र. (१) व (३) ची माहे मे २०२० मधील झालेल्या कामाची कार्यवाही व अमंलबजावणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम नं.६७(३)(क) अन्वये सदर ठिकाणचे काम संपेपर्यंत करून घेण्यास.

**विषय क्रमांक :– ३३७ त्वर्य**

मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन एम.बी.बी.एस. झालेले व इनटर्नशीप चालू असलेले, आर्युवेदीक कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन बी.ए.एम.एस. झालेले व इनटर्नशीप चालू असलेले, मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असलेले एम.बी.बी.एस.विद्यार्थी, मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन बी.एच.एम.एस. झालेले व इनटर्नशीप चालू असलेले नर्सिंग कॉलेजमध्ये नर्सिंगचे प्रशिक्षण असलेल्या नर्सेस तसेच इतर विभागातील सेवकांना पुणे मनपाकडे कोविड केअर सेंटर या ठिकाणी दरमहा मासिक मानधनावर रुजू करुन घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१९० दि.२७/७/२०२० चे पत्र.

१) मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन एम.बी.बी.एस. झालेले व इनटर्नशीप चालू असलेले विद्यार्थी यांना देय असलेले छात्रवृत्ती वेतन वगळता उर्वरीत रक्कम पुणे मनपामार्फत अदा करण्यात येणार असून छात्रवृत्ती वेतन + उर्वरीत रक्कम असे एकत्रीत मानधन र.रु.३०,०००/– दरमहा देण्यास,

२) आर्युवेदीक कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन बी.ए.एम.एस. झालेले व इनटर्नशीप चालू असलेले विद्यार्थी यांना देय सद्यस्थितीत देय असलेले छात्रवृत्ती वेतन वगळता उर्वरीत रक्कम पुणे मनपामार्फत अदा करण्यात येणार असून छात्रवृत्ती वेतन + उर्वरीत रक्कम असे एकत्रीत मानधन र.रु.२५,०००/– दरमहा देण्यास,

३) मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेऊन बी.एच.एम.एस. झालेले व इनटर्नशीप चालू असलेले विद्यार्थी यांना देय सद्यस्थितीत देय असलेले छात्रवृत्ती वेतन वगळता उर्वरीत रक्कम पुणे मनपामार्फत अदा करण्यात येणार असून छात्रवृत्ती वेतन + उर्वरीत रक्कम असे एकत्रीत मानधन र.रु.२०,०००/– दरमहा देण्यास,

४) मेडीकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असलेले एम.बी.बी.एस. विद्यार्थी यांना प्रतीदिन र.रु.५००/– अदा करण्यास,

५) नर्सिंग कॉलेजमध्ये नर्सिंगचे प्रशिक्षण असलेल्या नर्सेस यांना प्रतीदिन र.रु.४००/– अदा करण्यास,

६) कोविड केअर सेंटर / वॉर रुम /स्वॉब सेंटर / इतर कोविड बाबत कामकाज सुरु असलेले कार्यालय या ठिकाणी जे स्वयंसेवक व एक्स रे, लॅबमधील कामास मदत करणाऱ्या प्रत्येक सेवकास प्रतीदिन र.रु.१००/– अदा करण्यास,

वरील सर्व सेवकांना कामाचे कालावधीमध्ये ६ महिने कालावधी करिता केंद्र व राज्यशासनाकडील विमा कवच लागू राहील.

**विषय क्रमांक :– ३३८ त्वर्य**

सरदार वल्लभभाई पटेल कँटोन्टमेंट जनरल हॉस्पीटल, गोळीबार मैदान, शंकरशेठ रोड, कॅम्प, पुणे १ रुग्णालयाशी पुणे मनपाने पुणे शहरातील रुग्णांना उपचारार्थ ५० आयसोलेशन बेड ऑक्सिजनसहीत व १० आयसीयू बेड व्हेंटीलेटर सहीत, मनुष्यबळ, कंज्यूमेबल व रुग्णांचे जेवण इ. सोयी सुविधा पुरविणेसाठी करार करणेस व सदर सेवा पुरविणे कामी दरमहा र.रु.५०,००,०००/– (र.रु.पन्नास लाख रुपये फक्त) सहा महिने या कालावधीसाठी अदा करणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१९१ दि.२७/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३३९ त्वर्य**

कोविड–१९ चे उपचार करताना अधिकृत खाजगी वैद्यकिय व्यावसायिकांना बाधा झाल्यास होणाऱ्या उपचाराचे बीलाची रक्कम पुणे मनपाच्या अंशदायी योजने अंतर्गत अदा करणेस व र.रुपये ५० लाखाचे टर्म इन्शुरन्स प्लॅन कोविड–१९ चे उपचार देणाऱ्या सर्व अधिकृत खाजगी वैद्यकिय व्यवसायिकांस उपलब्ध करुन देणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/एचओ/१९२ दि.२७/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३४० त्वर्य**

केशवनगर, साडेसतरानळी व पुणे मनपा हद्दीलगत असलेल्या मांजरी येथे टँकरने पाणीपुरवठा करणे (भाग–२) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.रोहित वॉटर टँकर, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,०३,२००/– पेक्षा ६.१% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.४६,०४,१०४=८० पर्यंत काम करून घेण्यासाठी व त्यांच्याबरोबर करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१९३ दि.२८/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३४१ त्वर्य**
औंध क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करणे (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.स्वामी समर्थ वॉटर सप्लायर्स यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.४९,९९,६००/– पेक्षा ७.०००% कमी (स्वखुशीने) असल्याने त्यांचेकडून र.रु.४६,४९,६२८/– पर्यंत काम करून घेऊन त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१९४ दि.२८/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३४२ त्वर्य**
कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या व पुणे मनपा मध्ये नव्याने समाविष्ठ फुरसुंगी गावामध्ये दैनंदिन १०० खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (२०२०–२१) (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार जाधव ट्रान्सपोर्ट यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प. रक्कम र.रु.९९,९७,७७०/– पेक्षा ६% कमी दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.९३,९७,९०३=८० पर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१९५ दि.२८/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३४३ त्वर्य**
घनकचरा वाहतूकीची वाहने व बकेट दुरुस्तीसाठी ठेका पध्दतीने वेल्डर, फिटर, ॲटो इलेक्ट्रिशियन, स्प्रे पेंटर, सुतार व हेल्पर सेवक घेणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या २ टेंडर्सपैकी ठेकेदार मे. दिशा एजन्सी, पुणे यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर रक्कम र.रु.३,००,९२,५३४=५० पेक्षा ६.०९% जादा) असल्याने त्यांचेकडून काम करून घेणेसाठी खालील बाबीस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/मोवावि/१९७ दि.२८/७/२०२० चे पत्र.

१) मे. दिशा एजन्सी, पुणे यांचेकडून त्यांचे टेंडर दराने (६.०९% जादा) याप्रमाणे शासनाने वेळोवेळी निश्चित केलेल्या नविन वाढीव डीए (महागाई भत्त्या) आदा करुन रक्कम रु.३,१९,२५,१६९.८५ (अक्षरी रक्कम रुपये तीन कोटी एकोणीस लाख पंचवीस हजार एकशे एकोनसत्तर पैसे पंच्याऐंशी फक्त) पर्यंत आवश्यकतेनुसार घेणेस व त्यापोटी त्यांचेबरोबर करारनामा करणेस –––

२) घनकचरा वाहतूकीची वाहने व बकेट दुरुस्तीसाठी मनपाकडे सेवकवर्ग अत्यंत अपुरा असल्याने कंत्राटी सेवकांची सेवा बंद केल्यास मनपाचे मोटार वाहन विभागाकडील कामकाजामध्ये अडथळे येण्याची शक्यता असल्याने दि. १८/०५/२०२० पासून या निविदामधून ठेका पध्दतीने वेल्डर, फिटर, ॲटो इलेक्ट्रिशियन, स्प्रे पेंटर, सुतार व हेल्पर सेवक घेण्यात येणार असल्याने सदरचे सेवकांचे कामास पश्च्यात मान्यता मिळणेस–––

**विषय क्रमांक :– ३४४ त्वर्य**
कचरा डेपोमुळे पिण्याचे पाणी दुषित झालेल्या उरुळी देवाची व शेवाळवाडी येथे दैनंदिन खेपा टँकरने पाणीपुरवठा करणे (२०२०–२१) (भाग–१) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार एन.वाय.शिवरकर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (पु.ग.प.र.रु.९९,९६,४२५/– पेक्षा ७.९२% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु.९२,०४,७०८=१४ रकमेपर्यंत काम करून घेणेसाठी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता देण्याबाबत व याबाबतचा यापुर्वीचा मा.स्थायी समिती ठराव क्र. ३३६ दि.२१/७/२०२० चा निरस्त करण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/पापु/१९८ दि.२८/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :– ३४५ त्वर्य**
वारजे कर्वेनगर क्षेत्रिय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. १३, ३१, ३२ व उत्तमनगर, शिवणे मध्ये विविध ठिकाणी पडिक हद्दींची ठेकेदार पध्दतीने स्वच्छता करुन घेणे (सन २०२०–२१) चे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ८ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.सिध्दीविनायक एंटरप्रायझेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.६,५०,९९,२३९=९२ पेक्षा ४.७५% जास्त दराने) असल्याने त्यांचेकडून र.रु.६,८१,९१,४५३=८१ पर्यंत काम करुन घेणेस अधिक टेंडर अटी शर्तीतील वेळोवेळी होणारी वेतनवाढ व विशेष भत्यातील भाववाढ अदा करणेस व सदर काम अत्यावश्यक सेवेत मोडत असल्याने या कामास दि.१/६/२०२० पासून काम करुन घेणेस व त्यांचेशी करारनामा करणेस, बील अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(वि) यांचे जा.क्र. मआ/परि.क्र.३/१९९ दि.२८/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- ३४६ त्वर्य**

डॉ.नायडू सांसर्गिक रूग्णालय,कोव्हिड केअर सेंटर व पुणे मनपाचे रूग्णालयासाठी लागणा-या मेडिकल ऑक्सिजन सिलेंडर ४६.७ लिटर व मेडिकल ऑक्सिजन सिलेंडर १०.२ लिटर ऑक्सिजन रेग्युलेटर विथ बॉटल,स्पॅनर,टयुबिंग विथ मास्क व सिलेंडर ट्रॉली खरेदी करणे (टेडर क्रमांक १० सन २०२०-२१ ) कामी निविदा मागविल्या असता आलेल्या ३ निविदाधारंकांचे तुलना तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन केले असता क्लॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांनी मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे निविदेतील ॲटम् क्रमांक १,२,४,५ करीता शिवम ऑक्सिजन यांच्यापेक्षा कमी दर दिलेला असून व ॲटम क्रमांक ३ साठी शिवम ऑक्सिजन यांनी क्लॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि.यांच्यापेक्षा कमी दर दिलेला असल्याने मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे निविदेतील ॲटम क्रमांक १,२,४,५ क्लॉलीसर्ज सर्जिकल्स प्रा.लि. व निविदेतील ॲटम क्रमांक ३ शिवम ऑक्सिजन यांचेकडून विविध कोव्हिड सेंटर्सच्या मागणीनुसार व आवश्यकतेनुसार रक्कम रूपये १,७५,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये एक कोटी पंच्याहत्तर लाख फक्त ) पर्यंत खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/२०० दि.२८/७/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१
RE 17F 257
COVID- 19 अंतर्गत अत्यावश्यक महसूली कामासाठी खर्च.

**विषय क्रमांक :- ३४७ त्वर्य**

मा.बाळासाहेब ओसवाल यांचे दि.२८/७/२०२० चे पत्र.

मा.स्थायी समिती ठराव क्र.२२४,दि.९/६/२०२० (पुणे महानगरपालिका क्षेत्रात मलनि:सारण व पाणीपुरवठा विषयक कामांची गुणवत्ता राखण्याच्या दृष्टीने त्रयस्थ गुणवत्ता तपासक संस्था म्हणून मे.क्लिन वॉटर सोल्युशन्स प्रा,लि. यांची ठेकेदाराच्या बिलाच्या रकमेचा १.२५%+जी.एस.टी. (लागू असल्यास) दराने नेमणूक करणेस व यांचेकडून त्रयस्थ गुणवत्ता तपासक म्हणून काम करून घेण्यास मान्यता देण्याबाबत) चा फेरविचार करण्यात यावा.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**